| | |
|---|---|
| MHKO160001722026 | संक्षिप्त फौजदारी खटला क्रं.७६/२०२६<br>निशाणी क्रमांक - |

श्री. पी. बी. पवार, प्र.व.न्या.दं., मलकापूर-शाहुवाडी यांचेसमोर
राष्ट्रीय लोक अदालत, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपराध घडल्याचा दिनांक | - | ३१/१२/२०२५ |
| २ | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | - | ३१/१२/२०२५ |
| ३ | फिर्यादीचे पूर्ण नाव व पत्ता | - | महाराष्ट्र शासन तर्फे<br>शाहुवाडी पो. ठाणे, जि. कोल्हापुर |
| ४ | आरोपीचे पूर्ण नाव व पत्ता | - | महेश शंकर पाटील,<br>व.व. ५०, धंदा- शेती,<br>रा.- पुसार्ळे, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर |
| ५ | (ज्याबददल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील | - | आरोपाचा आशय... |

तुम्ही दिनांक ३१.१२.२०२५ रोजी २३-०० वाजणेचे सुमारास, पेरीड नाका, मलकापूर, ता. शाहुवाडी येथे तुमचे ताबेतील महिंद्रा कमांडर जीप क्र. एम.एच.११एच.७२२८ हे वाहन भरधाव वेगाने, अविचाराने, निष्काळजीपणे, रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करून, जेणेकरुन मानवी जीवीत धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत अगर क्षती पोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंचा हयगयीने चालविले आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय न्याय संहिता २०२३ कलम **२८१** खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

तुम्ही वरील नमूद दिनांक वेळी व ठिकाणी तुमचे ताबेतील महिंद्रा कमांडर जीप क्र. एम.एच.११एच.७२२८ हे वाहन भरधाव वेगाने, हयगयीने, निष्काळजीपणे, रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करून, जेणेकरुन मानवी जीवीत धोक्यात येईल अशा प्रकारे चालविले आणि त्याद्वारे तुम्ही मोटार वाहन कायदा कलम १८४ खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

तुम्ही वर नमूद दिनांकास, वेळी व ठिकाणी तुमचे ताबेतील महिंद्रा कमांडर जीप क्र. एम.एच.११एच.७२२८ हे वाहन मद्य प्राशन करून चालवित घेऊन जात असताना मिळून आलात आणि त्याद्वारे तुम्ही मोटार वाहन कायदा **कलम १८५** खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

| | | |
|---|---|---|
| **(ब)** कलम व अधिनियम | – | भारतीय न्याय संहिता २०२३ कलम २८१ व मोटर वाहन कायदा कलम १८४,१८५ प्रमाणे गुन्हा |
| **(क)** मालमत्तेचे मूल्य | – | -- |

**<u>आरोपीचे प्रतिकथन -</u>**

**प्रश्न १** - तुम्हाला पोलीस पेपर्सच्या नकला मिळाल्या काय

उत्तर - होय

**प्रश्न २** - आता तुमचेवर ठेवणेत आलेला चार्ज तुम्हाला मराठीतून वाचून दाखविला व समजावून सांगितला तो समजला काय

उत्तर - होय

**प्रश्न ३** - तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय

उत्तर - मला गुन्हा कबूल आहे.

------------
आरोपीची सही

समोर,
Pankaj
Bhimrao
Pawar

**स्थळ - शाहुवाडी**
**दिनांक १४/०३/२०२६**

**(पी. बी. पवार )**
**पॅनेल प्रमुख, राष्ट्रीय लोक अदालत व**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मलकापूर-शाहुवाडी.**

**<u>न्यायनिर्णय</u>**

वर नमूद आरोपीविरुध्द पोलीसांनी भारतीय न्याय संहिता २०२३ कलम २८१ व मोटर वाहन कायदा कलम १८४,१८५ अन्वये केस दाखल केली आहे. आरोपीस त्याचे विरुध्द असलेला दोषारोप वाचून दाखविला. तो दोषारोप आरोपीने स्वच्छेने मान्य व कबूल केला आहे. शिक्षेविषयी आरोपीचे म्हणणे असे की, तो त्याचे कुटुंबातील एकमेव कमवता इसम आहे, त्याची आर्थिक परिस्थिती हालाखीची आहे, त्यास कारावासाची शिक्षा झाल्यास त्याचे कुटुंबावर उपासमारीची वेळ येणार आहे, तसेच सदरचा गुन्हा त्याच्या हातून प्रथमच घडला आहे तरी कमीत कमी दंड करावा अशी विनंती केली आहे. मा. सरकारी विधिज्ञ यांनी आरोपीस जास्तीत जास्त शिक्षा देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

आरोपीचे म्हणण्यामधून त्याची कौटुंबिक परिस्थिती समोर येत आहे, तसेच आरोपीचे हातून हा गुन्हा प्रथमच घडला आहे तसेच त्याचेवर त्याचे कुटुंब अवलंबून आहे, आरोपीची आर्थिक परिस्थिती ही हालाखीची आहे. आज लोकन्यायालयामध्ये सदरचे प्रकरण निकाली करणेसाठी ठेवणेत आले आहे. या सर्व बाबींचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. आरोपीस भारतीय न्याय संहिता २०२३ कलम २८१ व मोटर वाहन कायदा कलम १८४,१८५ या गुन्हयासाठी दोषी ठरवून रक्कम रुपये **५,०००/-** (अक्षरी रुपये पाच हजार मात्र) दंड व दंड न भरलेस ०५ दिवस साधी कैद अशी शिक्षा फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(२) प्रमाणे सुनावण्यात येत आहे.

२. प्रस्तुत न्यायनिर्णयाची प्रत आरोपीस मोफत देण्यात यावी.

Pankaj
Bhimrao
Pawar

**स्थळ - शाहुवाडी**
**दिनांक १४/०३/२०२६**

**(पी. बी. पवार )**
**पॅनेल प्रमुख, राष्ट्रीय लोक अदालत व**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मलकापूर-शाहुवाडी.**

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | P.A. Vasudeo |
| Name of Court | P. B. Pawar, Panel Head, National Lok-Adalat & C.J.J.D & J.M.F.C. Malkapur-Shahuwadi |
| Date of Dictation | 14/03/2026 |
| Judgment signed by the P.O.on | 14/03/2026 |
| Judgment uploaded on | 14/03/2026 |